**आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात औद्योगिक प्रशिक्षण संस्था -कारागीर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण विस्तार योजनेसाठी निधी वितरण**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०२६/प्र.क्र. २०/का-९.**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
**दिनांक: ०४ जानेवारी, २०२६**

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ व दि.२९/०१/२०२६

२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाची ई-ऑफीस नस्ती क्र.(१४८०४२९) आयटीआय-२०२५/प्र.क्र.७ /शिकाना/व्यशि-३

प्रस्तावना :-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था -कारागीर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण विस्तार या योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पीत करण्यात आलेला निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव वाचा मधील अनु क्र.२ अन्वये आदिवासी विकास विभागास प्राप्त झाला. सदर योजनेंतर्गत अर्थसंकल्पीय अंदाज प्रणालीवर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पित तरतुदींतून वितरणासाठी उपलब्ध असलेल्या निधीपैकी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने मागणी केलेली निधी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

आदिवासी घटक कार्यक्रमातंर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मागणी क्र.टी-५ मधील २२३०-कामगार, सेवायोजना व कौशल्य विकास या मुख्य लेखाशिर्षांतर्गत **औद्योगिक प्रशिक्षण संस्था -कारागीर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण विस्तार या योजनेंतर्गत लेखाशिर्ष २२३० ६०७४ बाब क्र.११-देशांतर्गत प्रवास,१३-कार्यालयीन खर्च व ३४- शिष्यवृत्त्या/विद्यावेतने** करीता अर्थसंकल्पीय अंदाज वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेल्या निधीपैकी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने मागणी केल्याप्रमाणे एकूण रु.७१,९९,०००/- इतका निधी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील तरतुदींतून खालीलप्रमाणे वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

| **योजना व लेखाशिर्ष** | **उद्दिष्ट** | **सन २०२५-२६ साठी अर्थसंकल्पित तरतूद** | **सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी रु.** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| औद्योगिक प्रशिक्षण संस्था -कारागीर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण विस्तार **(लेखाशिर्ष २२३० ६०७४)** | ११- देशांतर्गत प्रवास | ८,००,०००/- | ४,८०,०००/- |
| | १३- कार्यालयीन खर्च | १८,९८,०००/- | ११,३९,०००/- |
| | ३४-शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने | ९३,००,०००/- | ५५,८०,०००/- |
| | **एकूण** | **१,१९,९८,०००/-** | **७१,९९,०००/-** |

२. उपरोक्त प्रमाणे **रु.७१,९९,०००/- (एकाहत्तर लक्ष नव्याण्णव हजार फक्त) इतका निधी** प्रशासकीय विभागप्रमुख म्हणून अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करताना नियंत्रक अधिकारी यांनी महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तिय नियम, तसेच वित्त विभागाच्या वाचा मधील अनु क्र.१ येथील शासन परिपत्रकांतील दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. नियंत्रक अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रात केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. त्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय/उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र इ. माहिती आदिवासी विकास विभागास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावी. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदींतुन फक्त अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना लाभ मिळेल याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वितरित करण्यात येत आहे त्याच प्रयोजनासाठी निधी खर्च होईल याची जबाबदारी संबधित प्रशासकीय विभागाची राहील.

५. सदर शासन निर्णय वाचा मधील अ. क्र.१ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२०४१११७२२०२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATISH VITHALRAO KOVE

Digitally signed by SATISH VITHALRAO KOVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=e13b027a7b550970150cf7dc69d276db3b1a6ebe3f71610fb5e8ff55b1676c8a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=CE18732734BA0742D7712775E8F0AD400558E8748375399762FD447C3E9AC1EB, cn=SATISH VITHALRAO KOVE
Date: 2026.02.04 12:12:50 +05'30'

**( सतीश कोवे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री,आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री,आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
६. संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
७. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/ नागपूर/ अमरावती.
८. सर्व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

९. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०. वित्त विभाग ( अर्थोपाय /अर्थ-१९ / व्यय-१४ ) मंत्रालय, मुंबई-३२.
११. कार्यासन-०६, आ.वि.वि. मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती,कार्यासन- ०६, आदिवासी विकास विभाग.